"दैनिक दिव्य मराठी"
" Divya Marathi "

दि. २५/०८/२०२१
Date:- 25/08/2021



**सोहळा** • भाकरनामा व मराठी गजल छंदांची बाराखडीचे प्रकाशन

# उर्दू-मराठीमध्ये डॉ. नदाफ यांनी भावनिक सेतू बांधला




प्रा. अजिज नदाफ यांच्या पुस्तकाचे प्रकाशन करताना मजहर अल्लोळी, मुबारक शेख, अय्यूब नल्लामंदू, नजीर शेख, माजी महापौर आरीफ, डॉ. नदाफ, कॉ. मोकाशी, प्र. प्राचार्य तांबोळी, डॉ. शकील शेख, विकार शेख.

प्रतिनिधी | सोलापूर

डॉ. अजिज नदाफ सरांनी उर्दूच्या कविता व चारोळ्या मराठीत अनुवादित करून दोन भाषांना व दोन भाषिकांना जवळ आणून उर्दू-मराठी साहित्यिकांमध्ये पूल बांधण्याचे व दोन मनांना जोडण्याचे कार्य केले. त्यांची दोन्ही पुस्तके नवोदित कवींना मार्गदर्शन करणारी व प्रेरणा देणारी आहेत. आज अशा साहित्याची गरज असल्याची अपेक्षा प्र. प्राचार्य डॉ. इक्बाल तांबोळी यांनी व्यक्त केली.

ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अजिज नदाफ यांनी अनुवादित केलेल्या 'भाकरनामा' व 'मराठी गझल छंदांची बाराखडी' या दोन पुस्तकांचा प्रकाशन समारंभ प्र. प्राचार्य डॉ. तांबोळी यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या वेळी कॉ. रवींद्र मोकाशी, उर्दू-मराठी साहित्य परिषदचे अय्यूब नल्लामंदू, प्र. प्राचार्य डॉ. शकील शेख, माजी महापौर आरीफ शेख, कवी मुबारक शेख, युनियनचे नजीर शेख, उर्दू फोरमचे विकार शेख यांची प्रमुख उपस्थिती होती. उर्दू-मराठी साहित्य परिषद व परिवर्तन अकादमीने हा सोहळा आयोजित केला होता. चित्रकार सय्यद मुहाफीज यांचा सत्कार मोकाशी यांच्या हस्ते व फारुक मटके यांचा सत्कार आरीफ शेख यांच्या हस्ते झाला. प्रास्ताविक अय्यूब नल्लामंदू यांनी केले. सूत्रसंचालन जाफर बांगी यांनी केले. आभार माजी प्राचार्य डॉ. गढवाल यांनी मानले.

## डॉ. नदाफ यांच्या कविता मानवतावादी

डॉ. नदाफ यांनी निवडलेल्या कविता मानवतावादी आहेत. त्या आजच्या कालखंडातही लागू पडणाऱ्या आहेत. साबीर दत्त यांच्या 'भाकरनामा'मधील कवितांना त्यांनी खऱ्या अर्थाने न्याय दिला आहे, असे प्रा. शकील शेख म्हणाले. यानंतर कवी मुबारक शेख यांनी 'मराठी गझल छंदांची बाराखडी' नवोदितांना दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करेल. सुरेश भटांनी महाराष्ट्राला गझलेची बाराखडी दिली. तर नदाफांनी छंदांची बाराखडी दिली. हा पुढचा टप्पा आहे, हे पुढचं वळण असल्याचे त्यांनी सांगितले. अजीज नदाफ यांनी मनोगत व्यक्त केले.

"दैनिक संचार"
"Sanchar"

दि:- २८/०८/२०२१
Date:- 27/08/2021

# नदाफ यांची मराठी साहित्यसेवा नवीन पिढीला प्रेरणादायी : तांबोळी

## 'भाकरनामा' व 'मराठी गजल छंदांची बाराखडी'चे प्रकाशन




संचार २८/०८/२०२१

**संचार प्रतिनिधी**

**सोलापूर, दि. २६-** ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अजीज नदाफ यांची मराठी साहित्यसेवा नवीन पिढीला प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन प्र. इक्बाल तांबोळी यांनी केले. मुंबईचे ज्येष्ठ उर्दू कवी साबीर दत्त लिखित 'रोटीनामा'चा मराठी अनुवाद ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अजीज नदाफ 'भाकरनामा' व 'मराठी गझल छंदांची बाराखडी' या दोन पुस्तकांचे प्रकाशन डॉ. तांबोळी यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी प्रा. गौस शेख यांनी कुराण पठण केले तर उर्दू-मराठी साहित्य परिषदेचे अय्यूब नल्लामंदू यांनी प्रास्ताविक केले. वैराग कॉलेजचे प्र. प्राचार्य डॉ. शकील शेख म्हणाले, डॉ. नदाफ यांनी निवडलेल्या कविता या मानवतावादी असून त्या आजच्या कालखंडातही लागू पडणाऱ्या आहेत. कवी मुबारक शेख यांनी, मराठी गझल छंदांची बाराखडी हे पुस्तक नवोदितांना दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करेल, असे सांगितले.

प्रकाशन समारंभ मोजक्याच परंतु साहित्यावर प्रेम करणाऱ्या मित्र मंडळाच्या उपस्थित झाल्याने समाधानी असल्याचे मत डॉ. नदाफ यांनी व्यक्त केले.

मुखपृष्ठाचे चित्रकार सय्यद मुहाफीज यांचा सत्कार रवींद्र मोकाशी यांच्या हस्ते व फारुख मटके यांचा सत्कार माजी महापौर आरिफ शेख यांच्या हस्ते करण्यात आला. सूत्रसंचालन जाफर बांगी यांनी केले तर आभार माजी प्राचार्य डॉ. गढवाल यांनी मानले.

यावेळी नजीर शेख, उर्दू फोरमचे विकार शेख, डॉ. जे. के. मुल्ला, डॉ. मुश्ताक शेख, सय्यद

"दैनिक संचार"
" Sanchar "

दि. ३०/०८/२०२१
Date:- 30/08/2021

# प्रा.डॉ. एम. के. शेख लिखित हॉकीनामा पुस्तकाचे प्रकाशन

संचार ३०/८/२१

शहर संचार

सोलापूर, दि. २९- सोशल महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक प्रा.डॉ. एम. के. शेख लिखित हॉकीनामा-२०२१ या पुस्तकाचे प्रकाशन प्रा. एल. ए. वड्डो यांच्या हस्ते करण्यात आले.

सोशल महाविद्यालयामध्ये आयोजित कार्यक्रमात प्रा. वड्डो म्हणाले, हॉकीनामा- २०२१ हे पुस्तक हॉकीच्या खेळाडूंना मार्गदर्शक आहे. या पुस्तकात हॉकीचा इतिहास व मैदानी हॉकीच्या अद्ययावत नियमांची संपूर्ण माहिती रेखाटली आहे. हॉकी खेळासंदर्भात संदर्भ ग्रंथांची रचना केली आहे.

'हॉकीनामा- २०२१' मध्ये प्रा.डॉ. शेख यांनी मैदानी हॉकीचा जागतिक, आधुनिक व भारतीय हॉकीचा इतिहास मांडण्याचा प्रयत्न केला आहे व विशेष म्हणजे आंतरराष्ट्रीय हॉकी संघटनेच्या अद्ययावत नियमांचा संपूर्ण मराठी अनुवाद अत्यंत चांगल्या पध्दतीने मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

यावेळी प्रा. एन.डी. आळंदकर, प्र. प्राचार्य डॉ. आय.जे. तांबोळी उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. जे.के. मुल्ला यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. नभा काकडे यांनी तर आभार प्रा. ए.ए. पटेल यांनी मानले.

## जिल्ह्यातील शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत

सोलापूर, दि. २९- गेल्या महिनाभरात दमदार पावसाने हजेरी लावली नाही. त्यामुळे जिल्ह्यातील बहुतांश भागातील शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. खरीप हंगामातील पिकांच्या वाढीसाठी पाऊस गरजेचा आहे.

"दैनिक सकाळ"
"Sakal"

दिनांक :- ०७/०९/२०२१
Date:- 07/09/2021

# विद्यार्थ्यांमध्ये जीवनमूल्ये रुजवणारेच खरे शिक्षक

## डॉ. सुहासिनी शहा : गुणवंत शिक्षक पुरस्कार वितरण समारंभ

**सकाळ वृत्तसेवा**

सोलापूर, ता. ६ : केवळ पटांगण इमारती व अन्य सुविधांमुळे शिक्षणसंस्था नावारूपास येत नसते. तर संस्थेतील शिक्षकांचे अध्यापन कौशल्य, विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडविण्याचे प्रयत्न, विद्यार्थी हिताविषयी तळमळ, नोकरी, व्यवसाय मिळवून देणारा अभ्यासक्रम, स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवता, धर्मनिरपेक्षता, थोरांप्रति आदर, राष्ट्रनिष्ठा इत्यादी जीवनमूल्ये रुजवणारे शिक्षक हे खरे शिक्षक असतात, असे प्रतिपादन प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांनी केले.

सोलापूर जिल्हा सामाजिक कार्य समिती व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेच्या वतीने शिक्षक दिनानिमित्त 'गुणवंत शिक्षक पुरस्कार' प्रदान समारंभात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी सोलापूर सोशल कॉलेजचे माजी प्राचार्य डॉ. के. एम. जमादार हे होते.



**सोलापूर : गुणवंत शिक्षकांसमवेत डॉ. सुहासिनी शहा, प्राचार्य के. एम. जमादार, डॉ. श्रीकांत येळेगावकर, उल्हास पाटील, प्राचार्य इ .जा. तांबोळी आदी.**

सकाळ 7/9/21

मंचावर उल्हास पाटील, डॉ. श्रीकांत येळेगावकर, सोशल कॉलेजचे प्रभारी प्राचार्य डॉ. इ. जा. तांबोळी, डॉ. एन. बी.तेली उपस्थित होते. प्राचार्य डॉ. संतोष कोटी (वालचंद कला व शास्त्र महाविद्यालय सोलापूर), प्रा. डॉ. संतोष राजगुरू (रयत शिक्षण संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय माढा), डॉ. निशा वाघमारे (समाजकार्य विभाग वालचंद कॉलेज सोलापूर), डॉ. जे. के. मुल्ला (सोशल कॉलेज सोलापूर), मुख्यध्यापक वीरेश थळंगे (शंकरलिंग प्रशाला वळसंग), संतोष हंपे (दयानंद काशीनाथ आसावा प्रशाला) यांना सन्मानपत्र, गौरवचिन्ह व शाल देऊन सन्मानित करण्यात आले. पद्माकर कुलकर्णी यांनी गुणवंत शिक्षकांचा परिचय करून दिला. डॉ. नभा काकडे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे, मुख्याध्यापक जितेंद्र पवार, प्रा. एम.एम. मस्के, डॉ. आयेशा रंगरेज उपस्थित होते.

"दैनिक दिव्यमराठी"
"Divya Marathi"

दिनांक:- ०८/०९/२०२१
Date :- 08/09/2021

# फातिमा शेख यांच्यावरील इंग्रजी पुस्तकाचे प्रकाशन



'आधुनिक भारतातील पहिली मुस्लिम शिक्षिका : फातिमा शेख' पुस्तकाचे प्रकाशन थाटात झाले.

दिव्यमराठी ८/९/२१

**सोलापूर ।** इतिहास तज्ञ नसीर सय्यद लिखित व प्रा. व्ही. के. पूर्णानंदमची यांनी अनुवादित केलेल्या 'आधुनिक भारतातील पहिली मुस्लिम शिक्षिका : फातिमा शेख' या इंग्रजी पुस्तकाचा प्रकाशन समारंभ प्रा. बी. एच. करजगीकर यांच्या अध्यक्षतेखाली झाला.

अय्यूब नल्लामंदू, प्राचार्य डॉ. इ. जा तांबोळी, ताहेर फडणीस, डॉ. उस्मान अ जब्बार नल्लामंदू, कवी मुबारक शेख, प्राचार्य डॉ. शकील शेख, अस्लम सयद, हाजी बशीर बागबान, कुद्दूस नल्लामंदू, हाजी तज्जमुल चांदा, प्राचार्य सिराज मोमीन यांच्या प्रमुख उपस्थितीत समारंभ झाला.

फातिमा शेख यांचे शिक्षणासाठी तन, मन, धनाने केलेले कार्य विसरता येणार नाही, असे मनोगत डॉ. शकील शेख, मुबारक शेख यांनी व्यक्त केले. बशीर बागबान, डॉ. इ. जा. तांबोळी, प्रा. बी. एच. करजगीकर यांनी फातिमा शेख यांच्या शैक्षणिक कार्याचा इतिहास सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी घेतली पाहिजे, असे मत व्यक्त केले.

मुहाफीज सय्यद, वसीम शाबाद, अशफाक सातखेड, रफीक खान, महमूद नवाज, महिबूब तांबोळी, अस्लम सय्यद, हाजी शाकीर चाँदा, कमर अल्लोळी, आफताब नल्लामंदू उपस्थित होते. सूत्रसंचालन ग्रंथपाल जाफर बांगी यांनी केले. मजहर अल्लोळी यांनी आभार मानले.

"दैनिक संचार
" Sanchar"

दि. २९/१०/२०२१
Date- 29/10/2021

२९/१०/२०२१

संचार

# विद्यार्थ्यांनी इतिहास संशोधनात योगदान द्यावे : सातपुते

शहर संचार

सोलापूर, दि. २८ - इतिहास विषयातून भविष्यकाळात वेध घेता येतो म्हणून विद्यार्थ्यांनी आपल्या परिसरातील ऐतिहासिक वास्तू, कागदपत्रे, स्मारके आदी साधनांच्या आधारे संशोधन करून इतिहासाच्या संशोधनात मोलाचे योगदान द्यावे, असे प्रतिपादन ग्रामीणच्या पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी केले.

किडवाई चौकातील सोशल महाविद्यालयातील इतिहास व आयक्यूएसी विभागाने आयोजित केलेल्या विद्यार्थी इतिहास परिषदेच्या अठराव्या राज्यस्तरीय अधिवेशनाच्या शुभारंभप्रसंगी सातपुते बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ. इ.जा. तांबोळी, प्रभारी कुलसचिव डॉ. सुरेश पवार, समन्वयक डॉ. नभा काकडे, प्राचार्य एम.ए.शेख, प्रा. नामदेवराव गरड, प्रा. एम.एम. मस्के, प्राचार्य राजशेखर हिरेमठ, परिषदेचे अध्यक्ष माऊली माने, सचिव अरबाज शेख, हाफिजा होटगी, अलिशा कादरी, अलिया शेख, निदा तारकश आदी उपस्थित होते.




सोलापूर : सोशल महाविद्यालयातील विद्यार्थी इतिहास परिषदेच्या अठराव्या राज्यस्तरीय अधिवेशनाचा शुभारंभ करताना पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, प्रभारी कुलसचिव डॉ. सुरेश पवार व अन्य.

इतिहासाचे अध्ययन व संशोधन केलेल्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा कठीण जात नाही, त्यांना हमखास यश मिळते. मात्र, त्यासाठी परिश्रम घ्यावे लागतात, असे सातपुते यावेळी म्हणाल्या.

यावेळी संशोधक नितीन अणवेकर, डॉ. महादेव देशमुख, डॉ. शीला स्वामी, प्रा. लक्ष्मी रेड्डी, डॉ. सुनीता गाजरे, प्रा. सोनाली गिरी, प्रा. दशरथ रसाळ, डॉ. रेवण बेरूणगीकर, डॉ. स्वाती घाटुळे, प्रा. सुमन केंद्रे, डॉ. साईनाथ कबाडे यांच्यासह राज्यभरातील ११० विद्यार्थी प्रतिनिधी उपस्थित होते.

"दैनिक दिव्य मराठी"
"Divya Marathi"

दिनांक:- २४/१२/२०२१
Date:- 24/12/2021

# सोशलमध्ये माती व पाणी परीक्षण केंद्राचे उद्घाटन



सोशल कॉलेजमध्ये माती व पाणी परीक्षण केंद्राचे उद्घाटन करताना मान्यवर.

प्रतिनिधी । सोलापूर

शेतकरी व शेती हा भारतीय समाज व्यवस्थेचा आणि अर्थव्यवस्थेचा कणा आहे. माती व पाणी परीक्षण यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शेतकऱ्यांना मदत होईल, असे प्रतिपादन दयानंद महाविद्यालयाचे भूगोल विभाग प्रमुख व विद्यापीठ भूगोल अभ्यास मंडळाचे डॉ.एन.जी. शिंदे यांनी केले. सोशल महाविद्यालयात भूगोल विभाग संचलित माती व परीक्षण केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रभारी प्राचार्य डॉ.इ.जा.तांबोळी होते व्यासपीठावर डॉ.एस.ए.राजगुरू, डॉ.डी. एस.नारायणकर, युनूस पठाण, मोहम्मद शेख इत्यादी होते. यावेळी ते म्हणाले की क्षार, शर्करा आदी सर्व पदार्थांचे संतुलित प्रमाण मातीमध्ये असणे उपयुक्त असून शेतकऱ्यांना माती व शेतीसाठी वापरण्यात येणारे पाणी यातील पोषणमूल्ये प्रमाणित ठेवण्यासाठी विद्यार्थ्यांनी मदत करावी. शेती उत्पादन वाढविण्यासाठी व प्रगत शेतीसाठी विद्यार्थ्यांची महत्त्वाची भूमिका असून ती त्यांनी पार पाडावी.

डॉ. इ.जा.तांबोळी म्हणाले, आज सोलापुरात अशी परिस्थिती आहे की बोरचे पाणी बांधकाम व घरगुती वापरासाठी वापरतात. त्यात क्षरयुक्तता वाढलेली असल्यामुळे नुकसान होत आहे. हे नुकसान टाळण्यासाठी पाणी परीक्षण करून विद्यार्थ्यांनी सुजाण नागरिक म्हणून आपली जबाबदारी पार पाडावी.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. सचिन राजगुरू यांनी केले पाहुण्यांचा परिचय डॉ. दीपक नारायणकर यांनी केले तर आभार आलिशा कादरी यांनी मानले. सूत्रसंचालन कुमारी निलोफर शेख यांनी केले. कार्यक्रमास डॉ. नभा काकडे व डॉ.युनूस पठाण, विभागाचे विद्यार्थी उपस्थित होते

दिव्य मराठी २४/१२/२०२१

"दैनिक पुण्य मराठी"
" Punya Nagari "

दिनांक:- 18/02/2022
Date:- 19/02/2022



My Style



# बालमनावर झालेले संस्कार; प्राचार्य पदाची धुरा

**सिव्हिल इंजिनियर झालो, पण स्वीकारला शिक्षकीपेशा**

**उच्च शिक्षणाच्या ध्येयवेड्या मनाने पीएच.डी.ही करवली**

**नाटक, समीक्षा, कादंबरी, ललित अशा बहुविध वाङ्मयामध्ये झेप**

आज्जींचा बागवानकी व्यवसाय. तरीही घरात शिक्षणाला महत्त्व देण्यात येत होते. त्यातल्या त्यात वडील शिक्षक असल्याने शिक्षणाला प्राधान्यच. उच्च शिक्षण घेऊन नोकरी करावी हे स्वतःचे ध्येय आणि घरच्यांची इच्छा. वीज नसलेल्या गावातील अंधारात चिमणी व पणत्यांचा उजेड करत मन लावून अभ्यास केला. बालमनावरच वडील व गावातील शिक्षकांच्या झालेल्या संस्काराच्या परिणामाने आजमितीस प्राचार्य पदाची धुरा सांभाळत आहे, असे एस.एस.ए. आर्ट्स अॅन्ड कॉमर्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. इक्बाल तांबोळी यांनी सांगितले.

**सादिक इनामदार**
मो.९०९६७१५१११

माझा जन्म दक्षिण सोलापूर तालुक्यातील भंडारकवठे येथे झाला. आज्जी केळी विकायची. वडील जानीसो तिला मदत करीत. यातूनच वडील प्राथमिक शिक्षक झाले. गावातीलच शाळेत माझे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पूर्ण झाले. उच्च शिक्षण घेऊन नोकरी करण्याची घरच्यांची इच्छा होती. त्यादृष्टीने माझी वाटचाल सुरू ठेवली. बालपणातील मित्रांसह गावाला सोडून उच्च शिक्षणासाठी शिवाजी

"दैनिक संचार"
"Sanchar"

दिनांक:- १०/०३/२०२२
Date:- 10/03/2022

**रिपाई**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, अल्पसंख्याक विभाग व सोशल महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महिला दिनानिमित्त राज्यस्तर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी शहर महिलाध्यक्षा सुनीता बोकडे होत्या. चर्चासत्राचे उद्घाटन शोभना सागर यांनी केले. या चर्चासत्रात नसीमा शेख, नसरिन शेख, डॉ. मीना गायकवाड यांनी विविध विषयांवर महिलांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमास रमाबाई लालसरे, सोनाली खरबस, प्रभा धनशेट्टी, अनिता कांबळे, इक्बाल शेख आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रदेशाध्यक्ष सुबोध वाघमोडे, अश्पाक शेख, प्रा. प्रदीप कोल्हे, प्रा. सुहास



**सोलापूर : महिला दिनानिमित्त रिपाइंतर्फे आयोजित कार्यक्रमात नसीमा शेख यांनी मार्गदर्शन केले.**

संचार 10/3/22

" दैनिक लोकमत "
" Daily Lokmat "

दिनांक :- २२/०३/२०२२
Date :- 22/03/2022

माऊलीच्या डोळ्यातून अश्रू वाहत होते.



सोशल महाविद्यालयात कविता सादर करताना प्रसिद्ध कवी. लोकमत

# सोशल महाविद्यालयात जश्ने उर्दू साजरा

22/3/22

लोकमत न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** एसएसए आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेजच्या उर्दू विभागातर्फे प्रभारी प्राचार्य डॉ. इ.जा. तांबोळी यांच्या अध्यक्षतेखाली उर्दू दिवस जश्ने-उर्दू म्हणून साजरा करण्यात आला. यासीन मकानदारने कुरआन पठण केले. उर्दू विभाग प्रमुख डॉ.चोबदार यांनी प्रास्ताविक केले. प्रा.तस्नीम वड्डोनी हिने पाहुण्यांचा परिचय करून दिला. यावेळी बज्मे गालीबचे अध्यक्ष बशीर परवाज, ज्येष्ठ कवी तालीब सोलापुरी, उर्दू-मराठीचे उपाध्यक्ष म. अय्यूब नल्लामंदू, सोशल कॉलेजचे मजहर अल्लोळी आदी उपस्थित होते. यानंतर, तालीब शोलापुरी यांनी आपली प्रसिद्ध कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

यानंतर, ज्येष्ठ कवी बशीर परवाजनी उर्दूचा प्रवास व आजची अवस्था यावर भाष्य केले. सूत्रसंचलन डॉ.निकहत शेख तर आभार डॉ.गौस शेख यांनी मानले. यावेळी प्रा.जैनोद्दीन पटेल, प्रा.वड्डो, प्रा.निकत शेख व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

"दैनिक दिव्य मराठी"
" Divya Marathi"

दिनांक - २३/०३/२०२२
Date - 23/03/2022

**न्यूज ब्रीफ** 23/3/22

## प्राचार्य इ. जा. तांबोळी यांच्या श्यामचा बाप पुस्तकास बागुल साहित्य पुरस्कार



सोलापूर । जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळ नागपूर या संस्थेकडून देण्यात येणारा बाबूराव बागुल साहित्य पुरस्कार सोशल आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेजचे प्रभारी प्राचार्य डॉ. इ. जा. तांबोळी यांच्या श्यामचा बाप या कादंबरीस जाहीर झाला आहे. महामंडळाचे अध्यक्ष दीपककुमार खोब्रागडे, डॉ. गोविंदराव कांबळे, सुजित मुरमाडे, डॉ. रवींद्र तिरपुडे यांनी पुरस्काराची घोषणा केली. प्राचार्य तांबोळी सन १९९५ पासून लेखन करत आहेत. त्यांच्या २४ पुस्तकांचे प्रकाशन झाले आहे. त्यांना विविध पुरस्कार मिळाले आहेत. तांबोळी हे आंबेडकर चळवळीत कार्यरत असून आरपीआयचे उपाध्यक्ष आहेत. नागपुरात दीक्षाभूमी येथे रविवार, २७ मार्च रोजी होणाऱ्या कार्यक्रमात या पुरस्काराचे वितरण होणार आहे.

"दैनिक लोकमत"
"Lokmat"

दिनांक :- १४/०३/२०२२
Date :- 14/03/2022

# हिंदी, उर्दू भाषेचा विकास व्हावा

## शफी आयुब : सोशल महाविद्यालयात कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**सोलापूर** : देशाची एकता व अखंडतेसाठी ऊर्दू आणि हिंदी या दोन्ही भाषांचा विकास व्हावा, असे मत जेएनयू नवी दिल्लीचे डॉ. शफी अय्यूब यांनी काढले. मासिक गुलबुटे (मुंबई), ऊर्दू मेला व एस.एस.ए. आर्टस अॅण्ड कॉमर्स महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मुलांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी राष्ट्रीय कार्यशाळा घेण्यात आली.



सोशल महाविद्यालयात राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी शफी आयुब, डॉ. शेख अब्दुल्लाह, अॅड. यासिन मोमीन आदी.

अध्यक्षस्थानी अंजुमने इस्लाम, मुंबईचे उपाध्यक्ष डॉ. शेख अब्दुल्लाह होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून रईस हायस्कूल भिवंडीचे चेअरमन अॅड. यासिन मोमीन, सोलापूर सोशल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. अख्लाक अहमद वडवान, खान कॅम्पस सोलापूरचे संस्थापक अध्यक्ष डॉ. असदुल्लाह खान, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. इक्बाल तांबोळी, मासिक गुलबुटेचे पत्रकार फारूख सय्यद, जेएनयू नवी दिल्लीचे डॉ. शफी अय्युब, गोरखपूर विद्यापीठाचे ऊर्दू विभागप्रमुख डॉ. साजीद हुसेन अय्युब, ऊर्दू बालभारती, पुणेचे स्पेशल ऑफिसर फॉर ऊर्दू खान नवीदुल हक, लेखिका सय्यदा नौशादबेगम, अदनान सरखोत, बज्मे गालिबचे अध्यक्ष बशीर परवाज आदी उपस्थित होते.

यावेळी डॉ. साजीदहुसेन अन्सारी, खान नवीदुल हक, सय्यदा नौशाद बेगम, अदनान सरखोत, बशीर हे कवी संमेलनाचे प्रमुख होते. मुंबईचे कवी सिराज सोलापुरी, पुण्याचे कवी शफीउद्दीन शुत्तारी, कवी इरफान कारीगर, मुश्ताक गदवाल यांनी कविता सादर केल्या. सूत्रसंचालन सफा शेख व आयेशा बुशरा यांनी पाहिले.

या दोन्ही कार्यक्रमाचे कार्यक्रम को-ऑर्डिनेटर म्हणून आसिफ इक्बाल व एजाज मंजुरआलम यांनी तर कवी संमेलनाचे समन्वयक म्हणून इरफान अ. रज्जाक पटेल व मोईज अहमद सिराज यांनी काम केले.

सूत्रसंचालन वजाहत अ. सत्तार यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी साकिब नाईकवाडी, सोबान शेख, आकिब शेख समीर निचकर, अली सय्यद, अ. समी सय्यद यांनी विशेष परिश्रम घेतले.

"दैनिक दिव्य मराठी"
"Daily Divya Marathi"

दिनांक :- २६/०३/२०२२
Date :- 26/03/2022



स्तुत्य उपक्रम • शैक्षणिक व दुर्धर आजाराच्या खर्चासाठी अर्थिक मदत

# गरजू विद्यार्थिनींसाठी सोशल कन्या विकास निधीची तरतूद

### सोशल महाविद्यालयातील ५० हून अधिक मुलींना लाभ, दानशूरांची मदत

प्रतिनिधी | सोलापूर

सोलापूर सोशल असोसिएशन कला व वाणिज्य महाविद्यालयात गरजू विद्यार्थिनी शिक्षणाच्या प्रवाहात राहिल्या पाहिजेत. पैशाविना कोणत्याही मुली शिक्षणापासून वंचित राहू नयेत. मुलींचे शिक्षण थांबू नये, आजारपणातही त्यांना अर्थिक मदत व्हावी, यासाठी महाविद्यालयात सोशल कन्या विकास निधीचा उपक्रम हाती घेतला आहे. याचा लाभ मागील वर्षभरापासून ५० हून अधिक मुलींना झाला आहे.

या निधीचा वापर फक्त गरजू मुलींच्या शैक्षणिक व काही दुर्धर आजारपणासाठी मदत म्हणून केला जात आहे.

सोशल महाविद्यालयाच्या प्र. प्राचार्यपदी डॉ. इ. जा. तांबोळी यांनी पदभार घेतल्यापासून महाविद्यालयामध्ये विद्यार्थीभिमुख कार्यक्रम राबवण्यावर भर दिला आहे. त्याचाच एक भाग म्हणून समाजातील दानशूर व्यक्तींकडून मदतीच्या स्वरुपात देणगी गोळा केली जाते. त्या निधीचा वापर सोशल कन्या विकास निधीच्या माध्यमातून शैक्षणिक कामासाठी केला जातो.

### सर्वत्र कौतुक

सोशल महाविद्यालयात सोशल कन्या विकास निधी हा उपक्रमाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. समाजातील दानशूर व्यक्तीबरोबर महाविद्यालयातील शिक्षकही वर्षाकाठी दोन हजार रुपये देऊन सहभाग नोंदवतात. हा उपक्रम सुरू करून एक शैक्षणिक वर्ष संपले आहे. समाजातील गरजू महिलांना याचा लाभ होत आहे.

### गरजू मुलींना लाभ

*महाविद्यालयात जास्त करून मुस्लिम समाजातील मुलींचे शिक्षण घेण्याचे प्रमाण जास्त आहे. त्या मुली सामान्य कुटुंबातील असल्याने शैक्षणिक शुल्क भरण्यासाठीही नसतात. ही समस्या भेडसावत होती. मुलींचे शिक्षण अर्ध्यावर राहू नये. यासाठी सर्व समाजातील दानशूर व्यक्ती व शिक्षकांच्या मदतीने सोशल कन्या विकास निधी हा उपक्रम हाती घेतला आहे. त्यातून शाळेतील बऱ्याच गरजू मुलींना लाभ होत आहे. दुर्धर आजारासाठी ही मदत केली जात आहे.*

**डॉ. इक्बाल तांबोळी,** प्र. प्राचार्य, सोशल महाविद्यालय

"दैनिक दिव्यमराठी"
"Divya Marathi"

दिनांक :- २८/०३/२०२२
Date :- 28/03/2022

# प्र. प्राचार्य डॉ. इक्बाल तांबोळी यांचा नागपूर येथे गौरव

**सोलापूर** । जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळ नागपूर या संस्थेकडून बाबूराव बागुल साहित्य पुरस्कार सोशल कॉलेजचे प्र. प्राचार्य डॉ. इक्बाल तांबोळी यांच्या 'श्यामचा बाप' या कादंबरीस देण्यात आला. नागपूर येथे हा पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम झाला. या पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे उद्घाटन मेंदू रोगतज्ज्ञ डॉ. चंद्रशेखर मेश्राम यांच्या हस्ते व भंते नागार्जुन सुरई ससाई यांच्या प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी महामंडळाचे अध्यक्ष दीपककुमार खोब्रागडे होते. या वेळी डॉ. गोविंदराव कांबळे, सुजित मुरमाडे, डॉ. रवींद्र तिरपुडे यांची उपस्थित होती.



डॉ. चंद्रशेखर मेश्राम व भंते नागार्जुन सुरई ससाई यांच्या हस्ते डॉ. इक्बाल तांबोळी यांचा गौरव करण्यात आला.

संचार
14/4/22



# विविध स्पर्धेत 'सोशल'चे यश



शहर संचार

सोलापूर, दि. १३- २०२१-२२ मध्ये घेण्यात आलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ व राज्यस्तरीय विविध क्रीडा स्पर्धेत सोशल महाविद्यालयाच्या खेळाडूंनी चमकदार कामगिरी केली.

यामध्ये आंतरविद्यापीठ स्पर्धेत मोहसीन मुल्ला व सादिकअली नदाफ यांनी हॉकीमध्ये, जैद शेखने ८०० मी. धावणे स्पर्धेत, सादिकअली नदाफ व अबरार जमादारने फुटबॉलमध्ये, फरहान आचेगावने बास्केटबॉलमध्ये तर राज्यस्तरीय स्पर्धेत जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करताना मोहसीन मुल्ला, अमजदअली शेख, आफताब पटेल व मोहसीन जमखंडी यांनी हॉकीमध्ये, सादिकअली नदाफ व अबरार जमादार, अल्तमश वळसंगकर व रेहान मुल्ला यांनी फुटबॉलमध्ये तर फरहान आचेगाव व म. शफी बळोरगी यांनी बास्केटबॉल स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले. या खेळाडूंना महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक डॉ. मुश्ताक शेख व तलहा शेख यांचे मार्गदर्शन लाभले. तर या यशाद्दल खेळाडू व प्रशिक्षकांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आय. जे. तांबोळी यांनी अभिनंदन केले.

epaper.lokmat.com
सोलापूर, शनिवार, दि. २३ एप्रिल २०२२ ४

# सोशलचे कॅप्टन गौस शेख यांना पुरस्कार



सोलापूर : सोलापूर सोशल असोसिएशन आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेजचे उर्दू विभाग समन्वयक, मौलाना आझाद मुक्त विद्यापीठ समन्वयक, एनसीसीचे ऑफिसर, पीएचडी गाइड कॅप्टन डॉ. गौस अहमद शेख यांना नुकताच महाराष्ट्र राज्य उर्दू अकादमी, मुंबई यांच्यातर्फे विद्यापीठ व महाविद्यालयीन स्तरावरील उर्दू आदर्श प्राध्यापक पुरस्कार जाहीर करण्यात आला. १५ हजार रोख, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. मुंबई येथे विशेष समारंभात या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आय.जे. तांबोळी व सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी त्यांचे कौतुक केले.

दिव्य मराठी सोलापूर, शनिवार, २३ एप्रिल २०२२

# डॉ. गौस शेख यांना महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर

प्रतिनिधी | सोलापुर

सोलापूर सोशल असोसिएशन आर्ट्स अँण्ड कॉमर्स कॉलेजचे उर्दू विभाग समन्वयक, मौलाना आझाद मुक्त विद्यापीठ समन्वयक, डॉ. गौस अहमद शेख यांना महाराष्ट्र राज्य उर्दू अकादमी, मुंबई यांच्यातर्फे विद्यापीठ व महाविद्यालयीन स्तरावरील उर्दू आदर्श प्राध्यापक पुरस्कार जाहीर करण्यात आला. महाराष्ट्रातील शालेय व महाविद्यालयीन स्तरावरील कृतिशील शिक्षक व प्राध्यापक यांना हा पुरस्कार देण्यात येतो. १५ हजार रोख, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

डॉ. गौस शेख यांचे २५ शोधनिबंध आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध आहेत. यूजीसीचा मायनर प्रोजेक्टही त्यांनी पूर्ण केलेला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली एका विद्यार्थ्यास पीएच. डी. प्राप्त झाली. चार विद्यार्थी पीएच.डी. करत आहेत. विद्यापीठाच्या उर्दू आणि एनसीसी अभ्यास मंडळाचे ते सदस्य असून, विविध समित्यांवर ते कार्यरत आहेत. मुंबई येथे विशेष समारंभात या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. आय. जे. तांबोळी व सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

Monday, April 25, 2022, Mumbai, www.inquilab.com

## ڈاکٹر غوث احمد شیخ کو مبارکباد



سوشل اسوسی ایشن آرٹس اینڈ کامرس کالج شولاپور کے اردو ڈپارٹمنٹ کے کوآرڈینیٹر، مولانا آزاد اوپن یونیورسٹی کوآرڈینیٹر، این سی سی آفیسر، پی ایچ ڈی گائیڈ، کیپٹن ڈاکٹر غوث احمد شیخ کو حال ہی میں مہاراشٹر اسٹیٹ اردو ساہتیہ اکیڈمی، حکومت مہاراشٹر کی جانب سے مثالی پروفیسر ایوارڈ کیلئے منتخب کیا گیا ہے۔ اس موقع پر کالج کے پرنسپل ڈاکٹر آئی جے تمبولی، تمام پروفیسرس، غیر تدریسی عملہ اور طلباء نے موصوف کو مبارکباد دی اور نیک خواہشات کا اظہار کیا۔

اقبال باغبان، بذریعہ ای میل

epaper.lokmat.com
सोलापूर, बुधवार, दि. २७ एप्रिल २०२२


# बेरिया, सय्यद, शेख यांचा सत्कार

सोलापूर : उर्दूची सेवा केल्याबद्दल व ॲड. यु. एन. बेरिया यांना 'उर्दू-अदब पुरस्कार' तर सय्यद मुहाफीज इक्बाल यांना 'उत्कृष्ट उर्दू डिझाईन ले - आऊट' तर आदर्श प्राध्यापक म्हणून डॉ. गौस शेख यांना जाहीर झाल्याबद्दल उर्दू-मराठी साहित्य सांस्कृतिक सेवा मंडळाच्या वतीने प्राचार्य इ. जा तांबोळी व प्राचार्य शकील शेख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी उर्दू-मराठी साहित्य परिषदचे उपाध्यक्ष अय्युब नल्लामंदू, ग्रंथपाल संघटनेचे जाफर बांगी, इंडियन युथ असोसिएशनचे मजहर अल्लोळी, मुस्लीम मराठी साहित्य परिषदेचे प्राचार्य शकील शेख, अबुबकर नल्लामंदू, इक्बाल सय्यद आदी उपस्थित होते.

दिव्य मराठी सोलापूर, गुरुवार, २८ एप्रिल २०२२

# राज्य स्पर्धेत सोशल महाविद्यालयाची कामगिरी



सोशल महाविद्यालयाच्या यशस्वी खेळाडूंसोबत प्राचार्य डॉ. आय. जे. तांबोळी, डॉ. मुश्ताक शेख, तलहा शेख

**सोलापूर ।** विद्यापीठ व राज्य स्पर्धेत सोशल वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयाच्या खेळाडूंची चार खेळात चमकदार कामगिरी केली. सर्व खेळाडूंना क्रीडा संचालक डॉ. मुश्ताक शेख व तलहा शेख यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आय. जे. तांबोळी यांनी अभिनंदन केले. **कामगिरी केलेले खेळ व खेळाडू - विद्यापीठ : हॉकी :** मोहसीन गुल्ला व सादिकअली नदाफ (गोल रक्षक) **मैदानी (८०० मी. धावणे) :** जैद शेख. फुटबॉल : सादिकअली नदाफ व अबरार जमादार. बास्केटबॉल : फरहान आचेगाव. **राज्य - हॉकी :** मोहसीन मुल्ला, अमजदअली शेख आफताब पटेल व मोहसीन जमखंडी. **फुटबॉल :** सादिकअली नदाफ, अबरार जमादार, अल्तमश वळसंगकर व रेहान मुल्ला. **बास्केटबॉल** फरहान आचेगाव व म. शफी बळोरगी.

epaper.lokmat.com
सोलापूर, सोमवार, दि. ९ मे २०२२ २

# सोशलमधील इरकल यांचा सेवानिवृत्तीबद्दल सन्मान




सोलापूर : सोलापूर सोशल असोसिएशन आर्टस् अँड कॉमर्स कॉलेजमधील वरिष्ठ लिपिक जहूर अहमद अ. अजीज इरकल हे ३२ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्त झाले. कॉलेजचे प्राचार्य ई.जा. तांबोळी यांच्या हस्ते इरकल यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी डॉ. ए.ए. गढवाल, डॉ.जे के. मुल्ला, जैनुद्दीन पटेल यांच्यासह शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी विविध मान्यवरांनी इरकल यांच्या आजपर्यंतच्या कारकिंदी विषयी आठवणींना उजाळा देत भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी सोशल कॉलेजमधील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थीवर्ग उपस्थित होते.



**प्राचार्य डॉ. आय.जे. तांबोळी**
राष्ट्रीय पुरस्कार-शामचा बाप या
कादंबरीस राष्ट्रीय पुरस्कार




**सभी अहले वतन को रमजान ईद की पुरखुलूस मुबारक बाद!**



**कॅप्टन डॉ. गौस अहमद शेख**
महाराष्ट्र राज्य साहित्य अकादमी पुरस्कार
आदर्श प्राध्यापक

## शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद
## एस.एस.ए. आर्टस् अ‍ॅन्ड कॉमर्स कॉलेज, सोलापूर